**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC- 2007(322/07) UNI- 4Dated27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act. 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI - 442 605 (M.S)
web www.unigug.org
Email : nssdsw.gug@gmail.com

पत्र क्र. No.GU/NSS/210 /2025 Dt : 14/11/2025

प्रती,

मा. प्राचार्य / विभाग प्रमुख / रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :— महाविद्यालयीन / विद्यापीठ स्तरीय शिबीराचे आयोजन करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत.

संदर्भ :— क्रमांक रासेयो—२०२५ / प्र.क्र १११ / रासेयो कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ०६ / ११ / २०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये सविनय या प्रमाणे आहे कि, युवा कल्यान क्रिडा मंत्रालय, भारत सरकार अंर्तगत रासेयो संहिता भाग ३ अंर्तगत प्रकरण १ २ ३ अन्वये निर्देशित माहीतीनुसार राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर आयोजनाबाबत दरवर्षी महाविद्यालयाला सुचित करण्यात येते मा. कुलगुरु तथा अध्यक्ष रासेयो यांच्या मान्यतेनुसार खालील बाबीसंदर्भात आपले लक्ष वेधुन नोंद घेण्यासंदर्भात विनंती करण्यात येते आहे.

१) सत्र २०२५—२६ मधील राष्ट्रीय सेवा योजनाअंर्तगत वार्षीक सात दिवसीय विशेष शिबीरांचे आयोजन दिनांक ०६ / ११ / २०२५ ते दिनांक ३१ / ०१ / २०२६ या कालावधीत करण्यात यावे. विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या कालावधीत महाविद्यालयीन स्तरीय शिबीराचे प्रस्ताव कार्यालयाला सादर करणे अनिवार्य आहे. शिबीर प्रस्तावाशिवाय आयोजीत शिबीराला अनुदान मान्य करणे शक्य होणार नाही.

२) महाविद्यालयीन स्तरीय शिबीराचे आयोजन महाविद्यालय परिसरात न करता दत्तक ग्रामातच शिबीर आयोजन करणे अनिवार्य आहे. तसेच महाविद्यालय परिसरात शिबीर आयोजनाबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाला सादर करण्यात येऊ नये. कृपया गांभिर्याने नोंद घ्यावी.

३) आयोजीत शिबीराचा कालावधी पुर्णत: सात दिवसाचा असने अनिवार्य आहे. शिबीराकरीता मंजुर विद्यार्थी संख्येनुसार महिला व पुरुष कार्यक्रम अधिकारीसह शिबीर कालावधीत उपस्थित असने अनिवार्य आहे. रासेयो स्वंयसेवकांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, या करीता शिबीराचे नियोजन विद्यापीठ परिक्षेचा कालावधी लक्षात घेवुन करण्यात यावे.

४) आयोजित शिबीरात दत्तक ग्रामातील ग्रामस्थाचा सहभाग विविध उपक्रमांतर्गत उदा. श्रमदान, बौध्दिक सत्र, व सांस्कृतीक संदेशपर कार्यक्रम इत्यादीमध्ये असावा.

५) शिबिरामध्ये शासन निर्देशित व तसेच विद्यापीठाने सुचित केलेले अभिनव प्रकल्प, सर्वेक्षण, इत्यादीचा समावेश असावा.

६) विद्यापीठ स्तरीय शिबीराचे आयोजनापुर्वी जवळच्या पोलीस स्टेशन तसेच स्थानीक पोलीस पाटिल याना सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन पुर्वसुचना देण्यात यावी.

७) शिबीरार्थी शिबीरात सहभागी होण्यापुर्वी त्याचे रासेयो बाबत उदबोधन वर्गाचे आयोजन तसेच शिस्त व नियमांचे पालन करण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. शक्य तोवर शिबीराच्या कार्यक्रमाचे सत्रसंचालन, आभार प्रदर्शन, प्रार्थना, इत्यादी जबाबदारी शिबिरार्थीना देण्यात यावी.

८) महाविद्यालयीन स्तरीय शिबीर कालावधीत लोक सहभाग मिळण्याकरीता दत्तक ग्रामाच्या मध्यभागी किंवा वस्तीमध्ये शिबीराचे आयोजन करणे आवश्यक आहे. जणेकरुन ग्रामस्त लोक सहभाग संपूर्ण पणे मिळेल. लोक सहभाग मिळु शकत नसेल तर त्या ठिकानी शिबीराला मान्यता देता येणार नाही. किंवा आयोजीत शिबीर मंजुर करता येणार नाही. कृपया नोंद घ्यावी.

९) शिबिराच्या नियमांचे काटाक्षाणे पालन करण्याबाबत व स्वत:जबाबदारीबाबत पुरुष कार्यक्रम अधिकारी व महीला कार्यक्रम अधिकारी शिबीरात सहभागी असणे व पालकाचे हमीपत्र शिबीरार्थीकडुन घेण्यात यावे.

१०) शिबीर स्थळी रासेयो स्वंयसेवक रासेयो बॅच तसेच बौध्दिक सत्रात रासेयो डायरीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११) शिबीरस्थळी लावण्यात येणाऱ्या बॅनरवर विद्यापीठाचा, महाविद्यालयाचा शिबिर स्थळ व कालावधी असणे आवश्यक आहे व नामोल्लेख असणे अनिवार्य आहे. तसेच शिबिर स्थळासंदर्भात माहीती कळावी या करीता मुख्य मार्गावर शिबीर स्थळ निर्देशित फलक लावणे अनिवार्य आहे.

१२) शिबीर आयोजन कार्यक्रम पत्रीका मा. कुलगुरु मा. राज्यसंपर्क अधिकारी, रासेयो कक्ष मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांना nssmantralaya@gmail.com या ई मेल आयडिवर व मा. संचालक रासेयो प्रादेशिक केंद्र, पुणे यांना nssrcpune@gmail.com या ई मेल आयडिवर तसेच रासेयो कार्यालय गोंडवाना विद्यापीठ nssdsw.gug@gmail.com या ई मेल आयडिवर शिबीर सुरु होण्याऱ्या दोन दिवस पुर्वी पाठविणे अनिवार्य आहे.

१३) शिबीराच्या आयोजनानंतर १५ दिवसाचे आत शिबीराचे लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र संपूर्ण माहीतीसह कार्यालयाने दिलेल्या विहीत प्रारुपातच सादर करणे अनिवार्य आहे. निर्धारीत कालावधीनंतर प्राप्त हिशेबाचे समायोजन किवा मान्यता देणे शक्य होणार नाही.

१४) विशेष शिबीरच्या कार्यक्रमाचे छायाचित्र जीपीएस मैप कैमरा ने काढावे. अन्य छायाचित्र ग्राह्य धरल्या जाणार नाही.

१५) विशेष शिबीर मध्ये मतदान जनजागृती या संदर्भात कार्यक्रमाचे आयोजन करावे.

१६) सत्र २०२५–२६ करीता रासेयो कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडुन निर्गमित करण्यात आलेली थीम "Youth for My Bharat" व "Youth for Digital Literacy" ची अमलबजावणी करावी.ज्या महाविद्यालयाचे भारत Registration झाले आहे, त्यानी My Bharat Portal वर activities Event तयार करून Upload करावे.

कृपया उपरोक्त बांबीसंदर्भात संबधीत कार्यक्रम अधिकारीना गांभीर्याने नोंद घेण्याबाबत सुचित करावे, ही विनंती.

टिप :– १) राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीराचे आयोजन स्थानिक प्रशासनाची मान्यता घेऊन प्रशासकिय अधिकारी यांना बोलावणे आवश्यक आहे.

२) विशेष शिबीराची माहिती १) महाविद्यालयाचे नाव २) शिबीराचे ठिकान ३) दिनांक ४) विशेष उपक्रम या बाबतची माहिती सादर करणे आवश्यक आहे.

**३) शासन निर्णय क्रमांक रासेयो २०२५/प्र.क्र ८९/ई १३३७०५३/रासेयो कक्ष उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ नुसार आवंटित विद्यार्थी संख्या नुसार गोंडवाना विद्यापीठाला नियमित करीता १०००० संख्या व विशेष शिबीराकरीता ५००० संख्या मंजुर करण्यात आलेली आहे. त्यामुळे सर्व रासेयो महाविद्यालयांना सुचित करण्यात येते कि रासेयो विभागाने सत्र २०२४–२५ मध्ये वितरीत करण्यात आलेली संख्या सत्र २०२५–२६ करीता ग्राहय धरावी.**

४) दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत सदर महाविद्यालयीन/विद्यापीठ स्तरीय शिबीराचे प्रस्ताव सादर करावे.

डॉ. श्याम खंडारे
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.